# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(३) अन्वये झालेले द्वितीय अपिल

## अपिल क्रमांक : केआर -४४२६/२०१७

अपिलार्थी,श्री.रामेश्वर गंगाराम डाखोरकर,
सह्याद्री नगर क्र.३, चाळ क्र.६, खोली क्र.१६,
बिर्ला कॉलेज रोड,गौरीपाडा, कल्याण (प.),
ता.कल्याण, जि.ठाणे ४२१ ३०१.

विरुध्द

जन माहिती अधिकारी,मुख्याध्यापक (प्राथमिक),
डी.एस.देसाई शाळा,एस.एस.पी.एम.एज्युकेशनल
कॉम्प्लेक्स, गौरीपाडा तलावासमोर,योगीधाम जवळ,
कल्याण (प.), ता.कल्याण, जि.ठाणे ४२१ ३०१.

जन माहिती अधिकारी, शिक्षण विभाग,
कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण (प.),
ता.कल्याण, जि.ठाणे ४२१ ३०१.

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : २७/४/२०१८**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल दाखल केल्याचा दिनांक | प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाचा दिनांक |
|---|---|---|---|
| २५/७/२०१७ | २७/७/२०१७ | १/९/२०१७ | ११/१०/२०१७ |

अपीलार्थीस दिनांक २५/७/२०१७ च्या माहिती अर्जान्वये मागितलेली सन २०१६ ते २०१७ या कालावधीतील डि.एस.देसाई इंग्लिश शाळेसंदर्भात पाच मुद्यांची माहिती न मिळाल्यामुळे आयोगास दिनांक १२/१०/२०१७ रोजी सादर केलेल्या द्वितीय अपिलावर आज दिनांक २७/४/२०१८ रोजी फास्ट ट्रॅक सुनावणी (Fast Track Hearing) घेण्यात आली.

सदर सुनावणीस उभयपक्ष उपस्थित आहेत. तसेच प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी सुनावणी दरम्यान विशद केले की, त्यांच्या दिनांक २५/७/२०१७ च्या अर्जान्वये मागितलेली माहिती त्यांना अद्याप मिळालेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी सांगीतले की, त्यांना माहिती अधिकार कायदा लागू होत नाही. परंतु मुद्दा क्र.१ व ५ ची माहिती उपलब्ध असणे आवश्यक आहे.

जन माहिती अधिकारी, शिक्षण विभाग यांनी नमूद केले की, शाळा अनुदानीत नसल्यामुळे, शाळेबद्दल माहिती दप्तरी उपलब्ध नाही. शाळा कायम विनाअनुदानीत आहे. माहिती शाळेशी संबंधीत असल्याने, शाळेकडे अर्ज हस्तांतरीत केला. शाळेला १५% पेक्षा जास्त फी मध्ये वाढ होत असेल तर शुल्काचे प्रस्ताव डेप्यु डायरेक्टरकडे सादर करावे लागतात.

शाळेचे प्रतिनिधी यांनी सांगीतले की, त्यांनी अपिलार्थी यांना दिनांक २८/८/२०१७ रोजी उत्तर दिले आहे की, शाळा विनाअनुदानीत असल्यामुळे, त्यांना माहिती अधिकार कायदा लागू होत नाही.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच उभयपक्षांचा युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग पुढील आदेश देत आहे.

## आदेश

१. जन माहिती अधिकारी, शिक्षण विभाग, कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत कलम ७ (६) व ७(९) मधील तरतुदीच्या अनुषंगाने, **अपिलार्थीस** उपलब्ध माहिती १५ **दिवसात समक्ष नि:शुल्क पुरवावी.** जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विविक्षित उत्तर अपिलकर्ता यांना १५ दिवसांत पाठवावे. सदर शाळा विना अनुदानीत असल्यामुळे, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत कलम २ (h) प्रमाणे सार्वजनिक प्राधिकरण ठरत नाही व माहिती अधिकार कायदा शाळेवर लागू होत नाही.

२. अपिल निकाली काढण्यात येत आहे.

(थँक्सी फ्रान्सिस थेकेकरा)
राज्य माहिती आयुक्त,
कोंकण खंडपीठ

कोंकण भवन,
बेलापूर, नवीमुंबई : ४०० ६१४.
दिनांक : २७ एप्रिल, २०१८

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**
प्रथम अपिलीय प्राधिकारी, प्रशासन अधिकारी, शिक्षण विभाग,
कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण (प.), ता.कल्याण, जि.ठाणे ४२१ ३०१.